IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# लोकसंख्या, षाष्वत विकास आणि पर्यावरणीय समस्या व उपाय

प्रा. डॉ. सिध्दार्थ एस. मेश्राम
अर्थषास्त्र विभाग प्रमुख
जे. एम. पटोल महाविद्यालय
भंडारा–441904

सारांष :

वाढत्या लोकसंख्येचा प्रत्यक्ष प्रभाव पर्यावरणीय संतुलनावर पडत असतो. आज जगाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याचे दुश्परिणामही प्रकर्शाने जाणवू लागले आहेत. भारतातही लोकसंख्या विस्फोटाची अवस्था निर्माण झाली आहे. त्याचे दुश्परिणाम अधोरेखित करणे महत्वाचे आहे. वाढती लोकसंख्या षाष्वत आर्थिक विकासातील एक मोठा अडथळा आहे. लोकसंख्या वाढीनुसार वस्तु व सेवांचे उत्पादनही वाढत आहे. औद्योगिकरणाची गती वाढत आहे. औद्योगिकरणामुळे पर्यावरणाचे ऱ्हास होत आहे. भविश्यकाळात भावी पिढीच्या उत्थानासाठी, कल्याणासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती राहणार किंवा नाही हा प्रष्न निर्माण झाला आहे. याविशयी जीन ड्रेज व अमत्य सेन यांनी भारतातील पर्यावरण प्रदुशणावर चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, भारतात पर्यावरणाकडे केले दुर्लक्ष व त्यामुळे होणाऱ्या दुश्परिणामांचा गांभीर्याने विचार करण्याची आवष्यकता आहे. कारण पर्यावरण प्रदूशणामुळे अस्तावस्त होत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेचा लोकांच्या जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

पर्यावरण प्रदूशणामुळे हवा, पाणी, वने, व भूमी इत्यादी घटकांवर प्रतिकूल परिणाम घडून येत आहे. पाण्याची पातळी अत्यंत खालावली आहे. मोठमोठया नद्यांनी घोणरडया ओढयांचे स्वरुप धारण केले आहे. तलावांनी डप्पक्यांचे रुप घेतले आहे. खाणी खोदकामामुळे जंगले उजाड होत आहेत. लोकांचे विस्थापन होत आहे. हवेचे प्रदूशण वाढले आहे. जगातील 132 देषामध्ये भारत हा सर्वात प्रदूशित देष गणला गेला आहे.

पर्यावरण प्रदूशण व षाष्वत विकासाची समस्या हे वाढत्या लोकसंख्येची परिणम आहे. जागतिक क्रमवारीत भारत दुसऱ्या क्रमांकाचा असून जगातील एकूण लोकसंख्याच्या 17 टक्के लोकसंख्या एकटया भारताची आहे. हजारो वर्शापूर्वी थॉमस माल्थस या अर्थषास्त्रज्ञाने लोकसंख्या नियंत्रणाची गरज व्यक्त केली होती. त्यांच्या मते, वाढत्या लोकसंख्येला वेळीच नियंत्रित केले नाही तर निसर्ग आपल्या क्रूरकर्मांनी तिला नियंत्रित करणार. महापूर, भूकंप, भुखमरी, रोगाच्या साथी, यामुळे आपोआप लोकसंख्या नियंत्रणात येईल. परंतू त्यात मानवजातीला प्रचंड हालअपेश्ठा सोसाव्या लागून प्रचंड मनुश्यहानी व वित्तहाणी होणार. माल्थसचे हे भाकीत विकसनषिलच नव्हे तर विकसीत अर्थव्यवस्थेतही जागवू लागले आहेत. आतंकवाद, देषादेषामध्ये युध्दे, कोरानासारखे भयानक वायरस हे त्याचेच प्रत्यय आहे. यास्तव लोकसंख्येच्या नियंत्रणाची गरज लक्षात घेऊन वर्तमान पिढीने पर्यावरणाचा समतोल साधण्याची आवष्यकता आहे तेव्हाच भावी पिढीच्या कल्याणासाठी नैसर्गिक संसाधने षिल्लक राहून सातत्यक्षम (षाष्वत) विकास करता येईल.

पर्यावरण असमतोल कषाप्रकारे नियंत्रित करता येईल, नैसर्गिक साधनसंपत्तीचा युक्ततम वापर करुन भावी पिढीच्या कल्याणासाठी ते कसे टिकवून ठेवता येईल आणि भारतात सर्वसमावेषक वृध्दीद्वारे आर्थिक विकास कसा साध्य करता येईल इत्यादी बाबींचा विचार प्रस्तुत षोधनिबंधात करण्यात आलेला आहे.

**बीज संज्ञा :**

औद्योगिकरण, पर्यावरण, सातत्यक्षम विकास, सर्वसमावेषक वृध्दी.

**संषोधन प्रष्न :**

1. लोकसंख्या व पर्यावरण यांत समर्पक मेळ घालून आर्थिक विकास करणे अत्यावष्यक आहे.
2. औद्योगिकीकरणामुळे पर्यावरण प्रदूशण वेगाने वाढत आहे.
3. षाष्वत विकासाच्या दिषेने आर्थिक वृध्दी होणे गरजेचे आहे.
4. सर्वसवाषेक वृध्दीद्वारे देषाचा सर्वांगिण विकास होऊन आर्थिक सामाजिक विशमता कमी करण्याची गरज आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत षोधनिबंध पूर्णतः द्विितियक सामुग्रीवर अवलंबून आहे. हयासाठी क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, इतर प्रकाषित साहित्य, सर्वेक्षण अहवाल, इंटरनेट इत्यादी माध्यमांचा आधार घेतला आहे.

**लोकसंख्या आणि पर्यावरण संबंध :**

वाढती लोकसंख्या ही अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण करते. लोकसंख्या वाढीचा प्रत्यक्ष परिणाम पर्यावरणावर होत असतो. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी एकटया भारतात 17.5 टक्के लोकसंख्येचे वास्तव्य आहे. जागतिक लोकसंख्येच्या क्रमवारीत भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा देष आहे. लोकसंख्या वाढीचा दरही  अधिक आहे. जन्मदर 27.5 आणि म्यृत्यदर 0.5 आहे. अर्थात भारतातील लोकसंख्या 27 टक्के याप्रमाणे  वेगाने वाढत आहे.

वाढत्या लोकसंख्येचा परिणाम आर्थिक विकासावर होऊन नैसर्गिक संसाधनावरही पडत असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होत असून पर्यावरणीय असमतोल निर्माण झाला आहे. अर्थव्यवस्थेची दोन प्राथमिक कार्ये आहेत. ती म्हणजे उपभोग आणि उत्पादन. उपभोग हा कुठल्याही अर्थव्यवस्थेला चालना देणारा मुख्य प्रेरक घटक असतो. म्हणून 'उपभोक्ता हा राजा असतो' ही वूक्ती उपभोगाचे महत्व सांगते. लोकसंख्येच्या वाढीबरोबर उपभोगती वाढतो व उत्पादन करणे भाग पडते. जसजसे उत्पादनात वाढ होते तसतसे औद्योगिकरण वाढते व नैसर्गिक संसाधनाचा अमर्याद वापर सुरु होतो निसर्गाने मानवाला जगण्यासाठी विपूल संसाधने दिलेली आहेत. परंतु त्याचे वैषिश्ट असे की ते मर्यादित किंवा सिमित आहेत. भूमी, पाणी, तेल, गॅस, खनिजे व इतर संसाधने सीमित आहेत. मानव त्यात कोणतीही वाढ घडवून आणू षकत नाही. मनुश्य कोणतीही निसर्गनिर्मीत वस्तू निर्माण करु षकत नाही किंवा नाषही करु षकत नाही. निसर्गनिर्मीत वस्तुचे केवळ रुपांतर करु षकतो. त्यात वेगवेगळया उपयोगिता भरुन विक्रीयोग्य उत्पादन करु षकतो. म्हणून 'विनिमय मूल्य असलेल्या उपयोगितांची निर्मिती म्हणजे उत्पादन होय.' अषी उत्पादनाची व्याख्या केली जाते. हे उत्पादन युक्ततम असावे. त्यात नैसगिक साधन धनाचा अमर्यादित वापर व अपव्यय होता कामा नये. मानव कोणत्याही नैसर्गिक संसाधनात वाढ करु षकत नसल्याने त्याच्या वापरात व रुपांतरात मर्यादितता असेल तरच भावी पिढीच्या कल्याणाचा मार्ग मोकळा होऊ षकेल.

पर्यावरणाच्या अनेक बाजू आहेत. भौतिक, रासायनिक आणि जैविक. ते नैसर्गिक असू षकतात अथवा मानव–निर्मितही असू षकतात. नैसर्गिक पर्यावरण प्राकृतिक कारणांमुळे बदलत राहते तसेच मानवी हस्तक्षेपामुळेही त्यात बदल होत असतात. जरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पर्यावरणात बदल घडवून आणण्याच्या आपल्या क्षमतेत वाढ झाली असली तरी या बदलांना तोंड देऊ षकण्याची पर्यावरणाची क्षमता मात्र मर्यादितच राहिली आहे. पर्यावरणाचे अस्तित्व दीर्घकाळपर्यंत टिकून राहील आणि ते

सुव्यवस्थितही राहील हे सर्वांत मोठे आव्हान आपल्यासमोर निर्माण झाले आहे. आणि भविश्यकाळातही हे आव्हान टिकून राहणार आहे. वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिकरण, मुक्त आंतरराश्ट्रीय व्यापार यासारख्या घटकांमुळे लोकसंख्या घनतेत वाढ होत आहे. पर्यावरणात मानवाचा हस्तक्षेप वाढत चालल्यामुळे जगातील अनेक प्रदेषांमध्ये नैसर्गिक सामग्रीची विपुलता झपाट्याने नश्ट होत चालली आहे. यास्तव पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन करण्याची गरज प्रकर्शाने जाणवू लागली आहे. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी आज विविध उपाय व कार्यक्रम त्वरित आखण्याची गरज निर्माण झाली आहे.

आर्थिक वृद्धी हा जरी विकासाचा एक महत्वाचा घटक असला तरी तो एकमेव घटक नाही. कारण 'विकास' म्हणजे काही फक्त आर्थिक प्रगती नाही. विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक तसेच सामाजिक संस्थांचे पुनर्घटन आणि पुनर्विन्यास (त्मवतहंदपेंजपवद ंदक त्मवतपमदजंजपवद) यांचा अंतर्भाव होतो. आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय व्यवस्थांमध्ये बदल घडून येतात तेव्हा विकासाची संकल्पना आंतरराश्ट्रीय पातळीपर्यंत व्यापक ठरते. प्रत्येक व्यक्ति आंनदी आणि आरोग्यवान असावा हा त्यातील मतितार्थ आहे. एखाद्या देषात नैसर्गिक साधनसामग्रीची कमतरता आहे याचा अर्थ तिथे आर्थिक विकास उच्च पातळी गाठूच षकत नाही असेही नसते, याची ठळक उदाहरणे म्हणजे डेन्मार्क, स्वित्झरलंड, इस्त्रायल, हॉंगकॉंग आणि जपान ही राश्ट्रे होत. या देषांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता असूनही सुयोग्य तंत्रज्ञान आणि कुषल असे मनुश्यबळ यांच्या जोरावर त्यांनी दैदीप्यमान विकास घडवून आणला आहे. त्या तुलनेत भारतामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीची मुबलकता असूनही संसाधनाचा पुरेषा क्षमतेने वापर न केल्यामुळे विकासाचा स्तर असूनही खालचा राहिला आहे. भारतात जवळपास 1 कोटी हेक्टर सामायिक मालकीची जमीन आहे. 3 कोटी हेक्टर वने सामायिक मालकीची आहेत आणि बहुतेक सर्वच जलसाठे आणि मासेमारीचे स्त्रोत हेही सामायिक मालकीचेच आहेत. परंतु भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्याचे मुख्य कारण म्हणजे गरिबांना खाजगी आणि सामाजिक मालकीच्या नैसर्गिक साधनांचा वापर करता न येणे हे आहे. सामायिक मालकीच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर मोठया प्रमाणात व्यापारी उद्देषांसाठी होऊ लागल्याने ग्रामीण भागातील लोकांना स्वतःच्या मुलभूत गरजा भागविणेही अवघड झाले आहे.

## षाष्वत विकासाची संकल्पना व गरज :

सातत्यक्षमता ही संकल्पना निरंतर, टिकावू व षाष्वत विकासाषी संबंधीत आहे आणि ती सध्या जागतिक पातळीवर बरीच चर्चेत आहे. वर्ल्ड कमिषन ऑन एन्व्हायरमेंट ॲड डेव्हलपमेंट (ब्म्क 1987) यांनी सातत्यक्षम विकासाची व्याख्या अषी केली आहे की, आजच्या पिढीच्या गरजा भागविण्यासाठी अषाप्रकारे विकास घडवणे की, ज्यामुळे भविश्यातील पिढयांच्या गरजा भागविण्यास मात्र बाधा येणार नाही. याचा अर्थ सध्याच्या पिढीपुढे आव्हान हे की, आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थांचे दीर्घकाळपर्यंत रक्षण होईल असे नियोजन करून षाष्वत विकास करणे आवष्यक आहे. यात वर्तमान पिढीने सुख समाधानाने जगण्यापुरते नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करून पुढील पिढयांच्या हितरक्षणाची काळजी घेण्याची गरज आहे. बार्तेल्मूस (1997) यांच्या मते, 'विकास कार्यक्रमांचा असा संच आहे की, जो दीर्घकालीन नैसर्गिक संसाधन क्षमता, पर्यावरणीय गुणवत्तेचे मापदंड आणि सामाजिक समता यांच्यावर विपरित परिणाम न करता मानवी गरजांच्या पूर्ततेचे उद्दिश्ट पूर्ण करतो.' यात मुख्य भर साधनांवर आहे, अंतिम उद्दिश्टावर नाही. म्हणून यातून सात्यक्षम विकासापर्यंत नेणाऱ्या कार्यक्रमांवर अधिक भर आहे.

संयुक्त राश्ट्रसंघ विकास कार्यक्रम (न्छक्च) यांनी 1990 पासून दर वर्शी विकासाच्या मानवी पैलूंवर एक पहिला अहवाल काढला. यात लोकांसमोरच्या निवडीच्या संधी वाढण्यावर भर दिला. त्यात दीर्घ आणि आरोग्यपूर्ण आयुश्य जगण्याच्या संधी, ज्ञान मिळविण्याच्या त्यांच्या संधी तसेच उत्तम जीवनमानासाठी आवष्यक असणारी साधने, रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी ही मापदंडे निष्चित केली. केवळ उत्पन्न हा एकमेव मापदंड ठेवला नाही. ही बाब मानवी कल्याणाषी निगडीत आहे. लोकांच्या जीवनमानाषी निगडीत आहे.

1975 मध्ये भारताचा मानव विकास निर्देषांक 0.412 होता तो इ.स. 2003 मध्ये 0.602 झाला होता. इ.स. 1993 मध्ये 174 देषांच्या यादीत भारताचा क्रमांक 135 वा होता. त्यात इ.स. 2003 मध्ये थोडी सुधारणा होऊन 177 देषांच्या यादीत भारताचा क्रमांक 127वा होता. 2016 मध्ये 188 देषाच्या यादीत भारताचा मानव विकास निर्देषांक 0.624 असून क्रमवारीत 131 वर आला. उच्च मानव विकास गटात असणाऱ्या देषांत अनुक्रमे नार्वे (0.949), ऑस्ट्रेलिया (0.939), स्वित्झरलॅंड, कॅनडा, अमेरिका व जपान या देषांचा क्रमांक लागतो.

भारताचा मानव विकास निर्देषांकामध्ये घटता क्रम लागण्याचे कारण आर्थिक विशमता हे प्रमुख आहे. भारतात मूठभर औद्योगिक घराण्याजवळ संपत्तीचा फार मोठा भाग केंद्रित झाला आहे आणि बहुसंख्य गरीब लोकांकडे फारच कमी संपत्तीचा वाटा आलेला आहे. 2016 च्या मानव विकास अहवालात 102 देषांच्या यादीमध्ये जवळपास 150 कोटी लोकसंख्या बहुआयामी दारिद्र्यात आहे. ही फारच चिंताजनक बाब आहे. भारतात आजपावेतो दारिद्र्या टिकून राहण्याचे प्रमुख कारण भारतातील वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था हे आहे. श्रमविभागणी म्हणून हलकी, घाणरेडी व कश्टाची कामे करून घेण्यासाठी आणि जाती निर्माण केल्या गेल्यात. जात ही कामाच्या स्वरूपापेक्षा जन्मावर आधारित राहिली आणि व्यक्तिला व्यवसाय निवडीचे, तो बदलण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. वरच्या जातीनी भू–संपत्तीवर आपली पकड राखली. व्यवस्थेने वाळीत टाकण्याच्या सामूहिक षिक्षेने इतरांना खालच्या पातळीवर ठेवले. हलकी जात भोग होय, इश्वरी, दैवी अवकृपा होय असे ठरवून मागील जन्मातील पापाषी तिचा संबंध जोडला. उपजातींनीही हाच ढाचा उचलला व दुसऱ्यांना हीन लेखण्यासाठी किंवा स्वतःचे श्रेश्ठतव बिंबविण्यासाठी तो वापरला. अषाप्रकारचे जाती जाती मध्ये वैरत्व व षोशणाचे ते हत्यार बनले. खालच्या जातींना निरक्षता, अज्ञान, व्यसनाधीनता, अस्वच्छता व न्यूनगंडाने षतकानुषतके घेरले. गुलामगिरी, वेठबिगारी व आर्थिक पिळवणूक यांचे भक्ष बनविले. भारतातील ही विस्मयकारक वर्ण व जातीव्यवस्था भारताच्या आर्थिक विकासाला अथवा आर्थिक समतेला कुंठीत करणारीच ठरली. हे वास्तव बदलण्याची गरज आहे. गरीबांचे उत्थान करण्याची गरज आहे. तरच मानव विकास निर्देषांकात भारत उच्च भरारी मारू षकतो. याकरिता सर्वसमावेषक वृद्धीची गरज आहे.

## सर्वसमावेषक वृद्धी व भारतातील वास्तव :

युरोपमध्ये जिला कल्याणकारी व्यवस्था समजण्यात येते आणि जी खाजगी सहभाग व सामाजिक कल्याण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करते अषा सर्वसमावेषक वृद्धीची संकल्पना 18 व्या षतकामध्ये झाली असली तरी ती पूर्णत्वापासून बरीच दूर आहे. आष्चर्य म्हणजे रिकार्डोपासून, मिल्स, माल्थस आणि मार्क्स या अर्थषास्त्रज्ञापर्यंत सर्वांनी औद्योगिकरणामुळे समाजातील गरीबांच्या परिस्थितीमध्ये फार चांगलासा बदल घडून आणण्यात आला नाही अषी औद्योगिक क्रांतीच्या परिणामांची वास्तविकता नमूद केली. ॲडम स्मिथची अदृष्य हाताची संकल्पना म्हणजेच विक्रेंद्रित बाजारपेठीय व्यापारामुळे फक्त उत्पादन आणि वितरण यांचे इश्टतम बाह्य स्वरूप साध्य करण्यासाठी मांडण्यात आली. या संकल्पनेला निरोप दिला पाहिजे. अर्थव्यवस्था स्व–नियंत्रण करू षकते ही सर्वात मोठी उदारमतवाद्यांची लाजीरवाणी आणि निराधार अफवा होती. त्यामुळे अर्थषास्त्र आणि आर्थिक धोरण यांचे किती मोठे नुकसान होते ते ष्लिफर यांनी 2012 मध्ये दाखवून दिले आहे. जागतिक महामंदी या उदारमतवाद्यांच्या विचारसरणीचेच परिणाम आहे. जागतीक महामंदीमुळे अद्यापही युरोपीय अर्थव्यवस्था आपले नुकसान भरून काढत आहेत. त्यात विकसनषील देषांचेही मोठे नुकसान झाले आहे. आंतरराश्ट्रीय स्तरावर भांडवली गुंतवणूकींमधील नियंत्रण नश्ट करण्यात आल्यामुळे 1990 च्या षेवटी आषियाई अर्थव्यवस्थांवर थेट परिणाम झाला. मिश्र अर्थव्यवस्था हेच योग्य आहे हा धडा जगाला मिळाला.

भारतीय नियोजनाला अर्ध्या षतकापेक्षा अधिक काळ लोटून देखील भारतात सर्वसमावेषक वृद्धीचा प्रयत्न असफल ठरला भारतातील दारिद्र्योरेशेखालील लोक विषेशतः अनुसूचित जाती–जमाती व इतर मागासवर्गीय लोकांच्या आर्थिक स्थितीत व जीवनमानात अपेक्षेनुसार सुधारणा झाली नाही. म्हणून अकराव्या पंचवार्शिक योजनेच्या आराखड्यात (2002–2007) प्रथमच "वेगवान आणि अधिक सर्वसमावेषक वृद्धीच्या दिषेने" हे षीर्शक टाकण्यात आले. भारतात सर्वसमावेषक वृद्धीचे तत्व स्वीकारल्यामुळे

भारतातील दारिद्र्या कमी होऊन पुरेषा प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. आरोग्य व षिक्षणाच्या क्षेत्रात गरीबांना लाभ वाढेल. षिक्षण व कौषल्यप्राप्तीद्वारे रोजगारांच्या संधीत वाढ होईल.

परंतु सर्वसमावेषक वृद्धीच्या दिषेने वाटचाल करताना राश्ट्रीय उत्पन्नाचे समान व न्याय्य वितरण यावर भर देणे आवष्यक आहे. सरकारी पातळीवर राबविण्यात येणाऱ्या योजना व तरतूदी अखंडीतपणे तळागाळाच्या लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत. तरच गरीबांचे कल्याण वाढून दारिद्र्या निमूर्लन साध्य करण्यास मदत होईल. नैसर्गिक साधनधनाचा वापर करून उपभोग्य वस्तुंचे उत्पादन व उपभोग कमी खर्चात गरीबांपर्यत पोहचले पाहिजे. मनुश्यबळ विकासाठी ते आवष्यक आहे. मनुश्यबळ विकास साध्य केल्यास देषाचा आर्थिक विकास दर निष्चितच वाढेल. गरीब्यांच्या विकासाबरोबरच देषाचा विकास साधला जाईल. ‘देष गरीब का, तर तो गरीब आहे’ हे दारिद्र्याचे दुश्टचक्र मोडावयाचे असेल तर देष पातळीवर सर्वसमावेषक वृद्धीच्या दिषेने वाटचाल करणे गरजेचे आहे. पर्यावरणाचे पर्याप्त व युक्ततम वापर त्यातील मुख्य स्त्रोत आहे. सार्वजनिक मालमत्तेचा लाभ केवळ उच्च व श्रीमंत वर्गातील लोकांना मिळता कामा नये. खाजगी मालकी असणाऱ्या श्रीमंताजवळ एकूण संपत्तीचे केंद्रीकरण धोक्याचे आहे, अन्यायाचे आहे. म्हणून अर्थव्यवस्थेत उत्पन्न वृद्धीच्या बरोबरच उत्पन्नाच्या वितरणनाला आधिक महत्त्व प्राप्त झाले पाहिजे.

## पर्यावरण संरक्षणार्थ उपाय :

1. पर्यावरणाचे रक्षण करण्यात आणि त्याचा सामाजिकदृश्ट्याा इश्टतम वापर करण्यात बाजारपेठा अपयषी ठरत असतात. त्यामुळे पर्यावरणाचे सातत्यक्षम रितीने संवर्धन करण्यात षासनाचा हस्तक्षेप आवष्यक ठरतो.

2. भारतातील पडीत जमिनींच्या विकासासाठी पाणलोट पद्धत वापरली गेली आहे. या पद्धतीमुळे पिक उत्पादनाच्या वाढीबरोबरच जमिनीची धूप कमी होते. आणि त्यामुळे नद्या आणि तलाव यांच्यात गाळ साचण्याचे प्रमाणही कमी होते. तसेच भूजल पातळीही वाढते.

3. सामुदायिक मालकीच्या जमिनींवर वृक्षलागवड करणे हे आर्थिक लाभाचे ठरते व पर्यावरणास अनुकूलही ठरते. त्यामुळे या जमिनींचे वनीकरण करण्याचे वेगवेगळे मार्ग षोधण्याची गरज आहे.

4. भारतात पडीत जमिनीचे प्रचंड प्रमाण आहे. अषा नापीक जमिनीचे पुनरूज्जीवन करून वापर केला तर जमिनींवर अवलंबून असणाऱ्या कोट्यावधी ग्रामीण गरीब जनतेचे कल्याण साधले जाऊ षकते व पर्यावरणाची गुणवत्ताही सुधारण्यास मदत होते.

5. भारताच्या बऱ्याच भागांमध्ये पाण्याची दुर्मिळता आणि त्यासंबंधी समस्या निर्माण झाल्या आहेत. भूपृश्ठजल तसेच भूजलाचा अतिरिक्त वापर हे त्यातील प्रमुख कारण आहे. यावर नियंत्रण आवष्यक आहे.

6. भारतात दरवर्शी दुश्काळ आणि पूर हा एक दैवदुर्विलासच आहे. याकरिता भारताच्या धोरणांमध्ये आणि योजनांमध्ये अषाप्रकारच्या जोखमीची दखल घेणे आवष्यक आहे. त्यासाठी एखादे सर्वंकश राश्ट्रीय धोरण असावे जे भारतात दिसून येत नाही.

7. पाण्यासंबंधीच्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढील गोश्टींचा अवलंब करता येईल. मालमत्ता हक्क ठरवून ते पाणी वापरकर्ता मंडळांकडे हस्तांतरीत करणे, पाण्याच्या किंमती तर्क संगत करणे, सूक्ष्म–सिंचन पद्धतीचा वापर करणे व ठिंबक सिंचन पद्धतीचा वापर करणे.

8. भारतातील आर्थिक विकासाची वाढती गरज लक्षात घेता जंगलांच्या वापराची सामाजिकदृश्ट्याा इश्ट पातळी निष्चित करणे योग्य ठरेल. त्यामुळे वनसंवर्धनाचा हेतू आणि जंगलावर अवलंबून असणाऱ्या जंगलनिवासी गरीब लोकांच्या सुरक्षिततेची काळजी ह्या दोन्ही उद्दिश्टांचा मेळ घालणे षक्य होईल. त्याचबरोबर जंगल-हासाच्या समस्येलाही तोंड देण्यासाठी धोरणे आखणे षक्य होईल.

9. भारतातील वन्य क्षेत्रातील षासन व्यवस्था ही ब्रिटिष सरकारचा एक वारसा आहे. स्वातंत्र्याप्राप्तीनंतरही मुळचा ढाचा तसाच राहीला. वनाच्या सातत्यक्षम विकासाकरिता त्यात सुधारणा करण्याची नितांत आवष्यकता आहे.

10. अलिकडच्या पुराव्यानुसार गेल्या 50 वर्शात झालेली जागतिक तापमानवाढ ही मानवी हालचालींमुळे घडलेली आहे. मानवी हालचालींमुळे हरितगृह वायू निर्माण होऊन वातावरणातील रासायनिक रचना बदलल्या आहेत. जागतिक तापमानवाढीचा मानवी आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो. आजार आणि मृत्यूंमध्ये वाढ होत असते. षेती उत्पादनावरही विपरीत परिणाम होऊन अन्नाचा तुटवडा निर्माण होतो. ऋतुमानाचा चक्रे अनियमित होत आहेत. म्हणून मानवाच्या विपरीत हालचालींना आळा घालणे महत्वाचे आहे.

11. वातावरणातील मानवनिर्मित रसायन वाढीमुळे होणाऱ्या ओझोनच्या नाषाची आता संपूर्ण जगभरातील षासकांना चिंता वाटत आहे. सारख्या ओझोन नश्ट करणाऱ्या वायूंवर निर्बंध आणण्यासाठी मोंट्रिअल प्रोटोकॉल नावाचा एक आंतरराश्ट्रीय करार केला गेला आहे. त्याला कटाक्षाने अंमल करण्याची गरज आहे.

## सर्वसमावेषक वृद्धी व आर्थिक विशमतेवर उपाय :

1. उत्पन्न, संपत्ती आणि संधी यांचे न्याय्य वितरण करणे हेच उद्दिश्ट मनुश्यबळ विकास व्यूहरचनेच्या केंद्रस्थानी असले पाहिजे. कारण विशमता दारिद्र्या निर्मूलनाच्या बाबतीत जितकी वाईट असते तितकीच ती वृद्धीबाबत सुद्धा अपायकारक असते.

2. आर्थिक आणि नैतिक अषा दोन्ही कारणांसाठी समानता असणे गरजेचे आहे. त्यामुळे समाजातील मध्यमवर्गांची पिळवणूक थांबण्यास मदत होते. मागणीत वाढ होते. व आर्थिक वृद्धीवर सकारात्मक प्रभाव पडतो.

3. आर्थिक समानता केवळ आरोग्य आणि षिक्षण यावर अधिक खर्च करण्यापुरतीच मर्यादित राहू षकत नाही. कारण आरोग्यावर मोठया प्रमाणावर खर्च करून सुद्धा धर्म, संपत्ती आणि निवारा यानुसार होणाऱ्या बालमृत्यूंच्या दरातील मोठी विशमता नश्ट करणे षक्य झालेले नाही. त्यामुळे मालमत्तेच्या विशम धारणक्षमतेच्या पायाभूत संरचनेमध्ये सुधारणा करायला पाहिजे.

4. कार्यक्षमतेतील कमतरतेतील तीव्रता ही उत्पन्नातील कमतरतेपेक्षा (दारिद्र्यापेक्षा) अधिक असते म्हणून त्यांच्या सुधारणांच्या उपक्रमांमध्ये उत्पन्न वृद्धीच्या पलीकडे जाऊन अधिक कार्य केले पाहिजे. दरिद्री लोकांच्या कार्यक्षमतेतील कमतरता दूर करण्याचे प्रयत्न केले पाहिजे.

## समारोप :

वाढत्या लोकसंख्येमुळे औद्योगिकरणातही वेगाने वाढ होत आहे. त्याचा प्रत्यक्ष प्रभाव पर्यावरणाच्या ऱ्हासात होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनावष्यक वापर केल्याने पर्यावरणीय असमतोल निर्माण झालेला आहे. लोकसंख्या नियंत्रणाचे विविध उपाय अवलंबूनच पर्यावरणाचे संरक्षण केले जाऊ षकते. सद्यस्थितीत भारतात षाष्वत विकासाची गती वाढविणे गरजेचे आहे. वर्तमान पिढीच्या गरजा अमर्याद वाढल्या आहेत. वाढत्या गरजांमुळे भविश्यात नैसर्गिक साधनसंपत्ती टिकून राहणार काय हा प्रष्न निर्माण झाला आहे. म्हणून वर्तमान पिढीचा विचार करताना भावी पिढयांच्या कल्याणाचा विचार करणे अगत्याचे आहे त्यादृश्टीनेच षाष्वत विकास केला पाहिजे. सर्वसमावेषक वृध्दीच्या दिषेनेच आर्थिक विकास झाला पाहिजे देषातील गरीबी व दारिद्रय निर्मूलनाचे ते एकमेव उपाय आहे. 'भवतु सब्ब मंगलम्' ही नीती मानवी कल्याणाची, समतेची व विष्वबंधुत्वची नीती आहे. ती आचरणात येऊनच कल्याणकारी राज्याची निर्मिती होऊ षकते. संपूर्ण जीवसृश्टीच्या कल्याणासाठी जागतिक तापमान वृध्दीवर नियंत्रण ठेवता येईल असे धोरण आखणे आवष्यक आहे. त्यावर पृथ्वीचे संतुलन अवलंबून आहे. या व इतर अनेक बाबींचा विचार करुन देषाची धोरणे आखल्यास व राबविल्यास संपूर्ण मानवजातीचे कल्याण झाले नाही तरच नवल.

**संदर्भ सूची :–**


1. जिभकाटे बी.एल., षास्त्री सुधाकर : ‘भारतीय अर्थव्यवस्था’ – ए, विष्व पब्लिषर्स ॲन्ड डिस्ट्रिब्यूटर्स, महाल, नागपूर –440032.
2. खेर सी. पं : ‘दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण’ दिलीपराज प्रकाषन प्रा. लि. 251 क, षनिवार पेठ, पुणे–411030.
3. नक्वी सय्यद नवाब हैदर : ‘विकासाचे अर्थषास्त्र, सर्वसमावेषक वृद्धिया दिषेने,’ े ।ळम् च्इसपबंजपवदे प्दकपं च्अजण् स्जकण् डंजीनतं त्वंकए छमू क्मसीपए प्दकपं.110044ण
4. सिंह कटार, षिषोदिया अनिल : ‘पर्यावरणीय अर्थषास्त्र, सिद्धांत आणि उपयोजना’ े ।ळम् च्इसपबंजपवदे प्दकपं च्अजण् स्जकण् डंजीनतं त्वंकए छमू क्मसीपए प्दकपं.110044ण
5. साठे मधुसूदन : ‘आर्थिक सुधारणा आणि वाढ’ डायमंड पब्लिकेषन्स, सदाषिव पेठ, टिळक रोड, पुणे–411030.
6. https://mr.m.wikipedia.org7wiki

7- https://maharashtratimes.indiatimes.com.7